आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० फेब्रुवारी २०२५ सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना
- परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर केलं स्नान
- बंगळुरू इथं एअरो इंडिया २०२५ चं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन
- जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित असल्याचा काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचा राज्यसभेत दावा

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राची आत्तापर्यंत २९ सुुवर्ण पदकांसह १२० पदकांची कमाई

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना झाले. पॅरिसमधे आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सह अध्यक्षपद ते भूषवतील. व्यापक जनहिताच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर परिषदेत चर्चा होणार असून जगातल्या विविध राष्ट्रांचे नेते आणि तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रमुख त्यात सहभागी होणार आहेत. याखेरीज फ्रान्स आणि भारताचे धोरणात्मक संबंध वृद्धिंगत

करण्याच्या दृष्टीनं मॅक्रॉन यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करणार असल्याचं मोदी यांनी प्रयाणापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन ते करणार असून तिथं आंतरराष्ट्रीय औष्णिक अणुभट्टीलाही ते भेट देतील.

फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री अमेरिकेला जाणार आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रंप यांच्या पुनरागमनानंतरच्या या भेटीसाठी आपण उत्सुक असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना केवळ परीक्षेत गुण मिळवण्याचा विचार न करता संबंधित विषयावर प्रभुत्व मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी परीक्षा पे चर्चा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दिला. ते म्हणाले . विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा महत्त्व दिलं पाहीजे, असं त्यांनी शिक्षक, आणि पालकांना सांगितंल. परीक्षेप्रमाणेच जीवनशैली विषयक अनेक प्रश्नांना मोदी यांनी उत्तरं दिली. पर्यावरण, कौटुंबिक नातेसंबंध अशा विविध विषयांचा त्यात समावेश होता.

***होल्ड बाईट मोदी (३८ सेकंद)***

परीक्षेच्या ताणताणावाचं व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमात प्रधानमंत्री विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. कार्यक्रमाची ही आठवी आवृत्ती असून ती ७ भागात नवीन स्वरुपात सादर होणार आहे. आतापर्यंत बंद सभागृहात किंवा प्रेक्षागृहात होणारा हा कार्यक्रम आज नवी दिल्लीच्या सुंदर नर्सरीत झाडा फुलांच्या सोबतीने झाला. सुरुवातीलाच प्रधानमंत्र्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तिळगूळ देऊन गोड बोला चा संदेश दिला. देशभरातून आलेले ३६ विद्यार्थी थेट सहभागी झाले. याखेरीज दूरस्थ पद्धतीनं सहभाग घेणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची

संख्या ५ कोटीपर्यंत गेली असून ही एक चळवळ बनली आहे. परीक्षेच्या ताणावर मात करण्यासाठी प्रधानमंत्र्यांच्या मौलिक मार्गदर्शनाचा फायदा झाल्याची प्रतिक्रीया अनेक विद्यार्थ्यांनी दिली आहे. ऋजुता या विद्यार्थिनीनं सांगितलं..

**होल्ड बाईट ऋजुता**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शालेय विद्यार्थ्यांसमवेत हा कार्यक्रम पाहिला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री  आशिष शेलार देखील उपस्थित होते.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केलं. नंतर त्यांनी अक्षयवट आणि  बडा हनुमान मंदिर इथेही भेट दिली. डिजिटल महाकुंभ अनुभव केंद्रात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे महाकुंभाची माहितीही त्यांनी जाणून घेतली. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल तसंच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हेही यावेळी उपस्थित होते. प्रयागराज इथल्या महाकुंभात आतापर्यंत ४३ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केलं आहे. १३ जानेवारीपासून सुरु झालेला महाकुंभमेळा येत्या २६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.

<><><><><>

सुरक्षा व्यवस्था मजबूत असेल तरच शांतता प्रस्थापित करणं शक्य आहे, त्यानंतरच आपण एका चांगल्या जगासाठी काम करू शकतो, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. बंगळुरू इथं एअरो इंडिया २०२५ चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. एअरो इंडिया हे भारताच्या संरक्षण सामुग्रीचं प्रदर्शन असून ते आशिया खंडातलं सर्वात मोठं प्रदर्शन मानलं जातं.

भारतानं नेहमीच शांतता आणि स्थैर्याचं समर्थन केलं आहे, मात्र केवळ एका देशात हे शक्य नसून संपूर्ण जगासाठीच हे महत्वाचं आहे, असं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात इतर देश सहभागी झाले यावरून ते आपल्या एक विश्व, एक कुटुंब, एक भविष्य या दृष्टीकोनाशी सहमत आहेत असं दिसतं असं ते म्हणाले. जागतिक स्तरावरच्या समस्यांना तोंड देण्यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतानं चालू आर्थिक वर्षात आयफोनच्या निर्यातीत एक लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे, अशी माहिती इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. याचं श्रेय सरकारच्या उत्पादनावर आधारित प्रोत्साहन योजनेला त्यांनी दिलं आहे. पुढच्या आर्थिक वर्षात स्मार्टफोनची निर्यात सव्वा दोन लाख कोटी रुपयांवर पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

संसदेत आणि राज्य विधिमंडळांमध्ये नियोजित पद्धतीनं व्यत्यय आणणं तसंच सदस्यांचा कामकाजातला कमी होत चाललेला सहभाग याबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी चिंता व्यक्त केली. १५ व्या महाराष्ट्र विधिमंडळातल्या नवनिर्वाचित सदस्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते आज दिल्लीत बोलत होते. कामकाजात जाणूनबुजून आणला जाणारा व्यत्यय संसदीय लोकशाहीसाठी घातक असल्याचं त्यांनी सांगितलं. विविध संसदीय समित्यांच्या कामकाजाबद्दल तसंच संसदीय भाषेत आपला मुद्दा मांडण्याबाबत त्यांनी सदस्यांना माहिती दिली.

**<><><><><>**

जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, त्यामुळे सरकारने लवकरात लवकर जनगणना करावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी

केली. राज्यसभेत शून्य प्रहरा दरम्यान त्या बोलत होत्या. ग्रामीण भागातल्या नागरिकांना ७५ टक्के आणि नागरी भागातल्या नागरिकांना लाभ देणं हे अन्न सुरक्षा कायद्याचं उद्दिष्ट आहे, हा विशेषाधिकार नसून नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, असंही गांधी म्हणाल्या. या कायद्यामुळे देशातल्या लाखो नागरिकांचं उपासमारीपासून संरक्षण झालं असंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

क्षमता विकास करणं आणि शालेय स्तरावरच कौशल्य विकासाची परिसंस्था निर्माण करणं हे कौशल्य विकासाच्या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे, असं कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. अनेक राज्यांनी कौशल्य विकास संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, मात्र केंद्र पातळीवर अशी संस्था स्थापन करायचा कोणताही विचार नाही, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेद्वारे आदिवासी समुदाय आणि इतर समुदायांना त्यांची कौशल्य विकसित करण्यासाठी मदत केली जात आहे, असंही चौधरी म्हणाले.

**<><><><><>**

उत्तराखंड इथं सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं आत्तापर्यंत १२० पदकांची कमाई केली आहे. यात २९ सुवर्ण, ४३ रौप्य आणि ४८ कांस्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी कायम आहे. ४२ सुवर्णपदकांसह सेना दलाचा संघ पहिल्या, तर ३१ सुवर्णपदकं पटकावून कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर टिकून आहे. २३ सुवर्णपदकांसह हरियाणा चौथ्या, तर २० सुवर्णपदकं जिंकून मध्य प्रदेश पाचव्या स्थानावर आहे. १५ सुवर्णपदकांसह यजमान उत्तराखंडचा संघ सातव्या स्थानावर आहे.

**//<><><><><>//**